देशोन्नती

# श्री शिवाजी क.म.वि. मध्ये सायबर सुरक्षा कार्यशाळा



देशोन्नती वृत्तसंकलन

**अकोट** : स्थानिक अंजनगांव मार्गावरील श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील सुमित संजय सपकाळ व अनिकेत विजय भुडके या सायबर वॉरियर्सनी ऑनलाइन फसवणूक, वाढता सोशियल मिडीयाचा वापर व त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाइन खरेदी, नवनवीन मोबाइलमध्ये येणारे ॲप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाइटस कशा ओळखाव्या, या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ.हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष मुख्याध्यापक वालसिंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षिका अंजली सपकाळ, शिक्षक चौधरी, हिंगणकर, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. (श.प्र.)

Akola Edition
Aug 7, 2024 Page No. 7
Powered by: erelego.com